# बृहन्मुंबई महानगरपालिका

महागणेशोत्सव
महाराष्ट्राचा राज्य उत्सव

# ॥श्रीगणेशोत्सव॥



❖ माहिती पुस्तिका - २०२६ ❖

॥श्रीगणेशमूर्ती पर्यावरणपूरक असावी, कृत्रिम तलावातच विसर्जित व्हावी॥

ही पुस्तिका डाऊनलोड करण्यासाठी 'क्यूआर कोड' स्कॅन करा.

श्रीगणेशमूर्ती विसर्जनासाठी कृत्रिम तलावांच्या माहितीकरिता 'क्यूआर कोड' स्कॅन करा.

# श्रीगणेशोत्सव

## महाराष्ट्राचा राज्य उत्सव, मुंबईचा लोकोत्सव

मुंबई! भटकंतीची आवड असलेल्या पर्यटकांच्या यादीत अग्रस्थानी असलेलं महानगर! स्वप्नांना आकार देणारं महानगर! कष्ट करण्याची तयारी दाखविणाऱ्या प्रत्येकासाठी सदैव कवाडे खुली ठेवणारे असे महानगर! या महानगराची जडणघडणच अशी आहे, की येथे सर्व स्तरातील नागरिक पदोपदी भेटतात. जगभरात मुंबईची ख्याती सतत धावणारं महानगर अशी असली तरी सण-उत्सव साजरे करण्यासाठी येथे प्रत्येकाने खास वेळ राखून ठेवलेला असतो. श्रीगणेशोत्सव म्हणजे मुंबईचा जणू ग्रामोत्सव. प्रत्येक मुंबईकराच्या या उत्सवाबाबत निरनिराळ्या आठवणी आहेत. या उत्सवाचे पडघम वाजायला लागले की, मुंबईमध्ये प्रचंड उत्साह संचारतो. एकात्मतेचं प्रतीक असलेला हा सांस्कृतिक सोहळा या मुंबापुरीच्या उंबरठ्यावर येवून ठेपला की इथली प्रत्येक गल्ली, चौक आणि महानगरालगतची उपनगरे गणरायाच्या स्वागतासाठी सज्ज होतात.

लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांच्या प्रेरणेने सुरू झालेला सार्वजनिक श्रीगणेशोत्सव साजरा करण्यासाठी मुंबईकर मोठ्या श्रद्धेने दरवर्षी एकत्र येतात. यंदाही हा उत्सव आनंदात आणि उत्साहात साजरा करण्यासाठी नागरिक तयारी करीत आहेत. त्यांना विविध प्रकारच्या सोयीसुविधा पुरविण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासन सुसज्ज आहे.

श्रीगणेशोत्सव आनंद, भरभराट, समृद्धी घेवून येत असतो. गतवर्षापासून तर या उत्सवाला महाराष्ट्राचा 'राज्य उत्सव' म्हणून घोषित करण्यात आले आहे. त्यामुळे मुंबईशी सांस्कृतिक नातं असलेला, मुंबई महानगरीचा मानबिंदू ठरलेला श्रीगणेशोत्सव आता संपूर्ण राज्याचा उत्सव म्हणून साजरा होत आहे. त्यामुळे हा उत्सव अधिकाधिक आनंदाने आणि तितक्याच उत्साहाने साजरा करण्याची आपल्या सर्वांची जबाबदारी वाढली आहे. या सांस्कृतिक उत्सवात आबालवृद्धांपासून समाजातील विविध वर्गातील लोक सहभागी होतात. यात विविध जातीधर्माच्या, पंथांच्या लोकांचा समावेश असतो.

मुंबईकरांना शाडू मातीपासून तयार केलेल्या पर्यावरणपूरक श्रीगणेशमूर्ती सहज उपलब्ध व्हाव्यात, यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने काही महत्त्वाचे उपक्रम हाती घेतले आहेत. विशेष म्हणजे केवळ शाडू मातीची किंवा पर्यावरणपूरक साहित्याने तयार केलेली श्रीगणेशमूर्ती तयार करणाऱ्या मूर्तिकारांना मूर्ती विक्रीसाठी काही ठिकाणी मोफत जागादेखील महानगरपालिकेने उपलब्ध करून दिली आहे. यासाठी अर्ज करण्याची प्रक्रिया ऑनलाईन असल्याने मूर्तिकारांसाठी सोयीचे झाले आहे.

माननीय उच्च न्यायालय, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ, माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री, वरिष्ठ मंत्रीगण, पोलिस प्रशासन यांच्या आदेशान्वये मुंबईतील श्रीगणेशोत्सव आनंदात आणि समाधानाने पार पडावा, यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडून दरवर्षी उत्तमोत्तम आणि सर्वसमावेशक सोयीसुविधा पुरविल्या जातात. मुंबईतील सार्वजनिक श्रीगणेश मंडळांना लागणाऱ्या विविध परवानग्या दिनांक १४ ऑगस्ट २०२६ पासून एक खिडकी योजनेद्वारे ऑनलाइन पद्धतीने देण्यात येत आहेत. यामुळे मंडळांचा वेळ वाचत आहे. महानगरपालिकेचे संकेतस्थळ https://mcgm.gov.in यावर ही सुविधा उपलब्ध आहे.

श्रीगणेशोत्सवादरम्यान विविध ठिकाणी मोठ्या संख्येने नागरिक एकत्र येतात. ही बाब लक्षात घेवून महानगरपालिकेच्या आपत्कालीन व्यवस्थापन विभागाद्वारे श्रीगणेशोत्सव मंडळाच्या पदाधिकाऱ्यांना / स्वयंसेवकांना आपत्कालीन व्यवस्थापन विषयक प्रशिक्षण मोफत देण्यात येते.

पर्यावरणपूरक मूर्ती घडविणाऱ्या मूर्तिकारांना दरवर्षीप्रमाणे यंदाही शाडूची माती महानगरपालिकेकडून मोफत पुरविण्यात आली आहे. आतापर्यंत एकूण ९०० मेट्रिक टनांहून अधिक शाडू माती मोफत वितरित करण्यात आली आहे. तसेच, एक हजारांपेक्षा अधिक मूर्तिकारांना मंडप परवानगी देण्यात आली आहे.तसेच गत वर्षापासून महानगरपालिके-कडून प्रायोगिक तत्त्वावर पर्यावरणपूरक रंग पुरवठा करण्यात आला. यावर्षी जवळपास २५ हजार लीटर रंग पुरविण्यात आले आहे. श्रीगणेशोत्सवाबाबत प्रशासनाकडून वेळोवेळी विविध सूचना, उपक्रमांबाबत माहिती दिली जाते. ही माहिती नागरिकांना, श्रीगणेशभक्तांना वेळेवर कळावी, यासाठी प्रशासनाकडून विविध प्रसारमाध्यमांचा प्रभावीपणे उपयोग केला जातो. यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावरून (https://mcgm.gov.in) तसेच समाज माध्यमांद्वारे ( mybmc mybmc my_bmc my bmc my mumbai) सातत्याने प्रचार आणि प्रसिद्धी केली जाते. वेळोवेळी परिपत्रकांद्वारे, वार्तापत्रांद्वारे, परिमंडळ आणि विभाग कार्यालय (वॉर्ड) स्तरावर बैठका घेवून नागरिकांपर्यंत माहिती पोहोचविली जाते. मा. उच्च न्यायालय तसेच न्यायालयीन स्तरावर वेळोवेळी देण्यात आलेल्या संबंधित आदेशांची परिणामकारक अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने योग्य ती कार्यवाही करण्यात येते.

पर्यावरणपूरक श्रीगणेशोत्सवाचा एक भाग म्हणून बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्व प्रशासकीय विभागांमध्ये कृत्रिम तलावांची निर्मिती करण्यात येते. या तलावांना दरवर्षी नागरिकांचा वाढता प्रतिसाद मिळत आहे. गतवर्षी कृत्रिम तलावांमध्ये १ लाख ८८ हजारांपेक्षा अधिक मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. यंदादेखील सर्व विभागांमध्ये ३८३ हून अधिक कृत्रिम तलाव तयार करण्यात आले आहेत. मुंबईकरांनी श्रीगणेशमूर्तींचे विसर्जन हे कृत्रिम तलावातच करावे, असे आवाहन करण्यात येत आहे. पर्यावरण रक्षणाचे हे भान आपल्याला निर्माल्याबाबत देखील जपायचे आहे. घरगुती व सार्वजनिक श्रीगणेशोत्सव मंडळाच्या ठिकाणचे निर्माल्य संकलित करण्यासाठी महानगरपालिकेने विसर्जन स्थळी निर्माल्य कलश उपलब्ध करुन दिले आहेत, त्यातच निर्माल्य संकलित करायचे आहे. असे करताना प्लास्टिक पिशव्यांचा वापर टाळायचा आहे. या निर्माल्यापासून खत तयार करण्यात येते. हे खत मुंबईतील विविध उद्यानांमध्ये वापरण्यात येते. पर्यावरणपूरकता जपण्याचा भाग म्हणून श्रीगणेशोत्सवादरम्यान ध्वनी प्रदूषण होणार नाही, याचीही काळजी घ्यायची आहे. त्यामुळे निर्धारित वेळेत व निर्धारित मर्यादेतच ध्वनिक्षेपकांचा वापर करायचा आहे.

पर्यावरणपूरक श्रीगणेशोत्सवासोबतच विविध सामाजिक विषयांवर प्रभावी देखाव्यांच्या माध्यमातून प्रकाश टाकत जनप्रबोधन करणाऱ्या सार्वजनिक श्रीगणेशोत्सव मंडळांना प्रोत्साहन मिळावे, या प्रमुख उद्देशाने दरवर्षी बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाद्वारे श्रीगणेश गौरव स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. यंदा या स्पर्धेचे ३७ वे वर्ष असून स्पर्धेत सहभागी होण्याच्या अर्जाचा नमुनादेखील या पुस्तिकेत पृष्ठ क्र. १२ व १३ वर दिलेला आहे. सार्वजनिक श्रीगणेशोत्सव मंडळांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहनही या निमित्ताने करण्यात येत आहे.

यंदाचा श्रीगणेशोत्सव दरवर्षीप्रमाणे उत्साहात साजरा करूया. त्याचबरोबर हा सोहळा अधिकाधिक आनंददायी व स्मरणीय ठरावा, यासाठी आपण सुखकर्ता गणरायाला विनंती करूया. सर्वांना श्रीगणेशोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा !



**श्रीमती रितू राजेश तावडे**
महापौर, मुंबई

**श्री. संजय शंकर घाडी**
उप महापौर, मुंबई

**श्रीमती अश्विनी भिडे**
महानगरपालिका आयुक्त

**डॉ. अविनाश ढाकणे**
अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे)

**श्री. प्रशांत सपकाळे**
उप आयुक्त ( परिमंडळ - २ ) तथा श्रीगणेशोत्सव समन्वयक

## बृहन्मुंबईतील
# गणेशोत्सव



मुंबईत श्रीगणेशोत्सव मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरा केला जातो. मुंबईत दरवर्षी सुमारे दहा हजारांहून अधिक सार्वजनिक व दोन लाखांपेक्षा जास्त घरगुती गणपती मूर्तींची स्थापना केली जाते. यासाठी विविध सेवासुविधा पुरविण्याच्या कार्याला बृहन्मुंबई महानगरपालिका किमान चार महिने आधीपासून सुरुवात करते. उत्सवापूर्वी, उत्सवादरम्यान व उत्सवानंतरसुद्धा महानगरपालिकेतर्फे अनेक सेवासुविधा पुरविल्या जातात. यासाठी बेस्ट, विविध गणेशोत्सव मंडळे, पोलीस, वाहतूक पोलीस, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, अदानी एनर्जी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एम.एम.आर.डी.ए.), मेट्रो, राज्य व केंद्र शासनाच्या अखत्यारितील विविध विभाग यांच्यासह मुंबईकर जनतेचेही मोलाचे सहकार्य बृहन्मुंबई महानगरपालिकेला मिळते. यामुळे हा उत्सव सुरळीतपणे व शांततेने साजरा करण्यास मदत होते.

श्रीगणेशोत्सव काळात महानगरपालिकेतर्फे मुख्यतः सार्वजनिक आरोग्य, रस्त्यांची देखभाल व दुरुस्ती, तात्पुरते रस्ते बांधणे, घनकचऱ्याचे व्यवस्थापन, वाहतूक नियंत्रण, विसर्जनाच्या ठिकाणी प्रकाश व्यवस्था; तसेच जीवरक्षकांची नेमणूक करण्यासह विविध कामे सुयोग्यपणे केली जातात. पर्यावरणाचा ऱ्हास रोखण्यासाठी गत काही वर्षांपासून निर्माल्य संकलन व विल्हेवाट लावण्याची स्वतंत्र व्यवस्था केली जात आहे. यामुळे निर्माल्य समुद्रात किंवा तलावात जात नाही, पर्यायाने जल-प्रदूषण टळते. यासाठी जनतेकडून मिळालेल्या उत्तम सहकार्यामुळे गतवर्षी ५०८ मेट्रिक टन निर्माल्य संकलित करण्यात आले. या निर्माल्यापासून मुंबईतील मोकळ्या जागांमध्ये खत तयार करुन त्याचा वापर महानगरपालिकेच्या उद्यानांमध्ये नियमितपणे केला जात आहे. याच अनुषंगाने यंदाही नागरिकांना निर्माल्य कलशांमध्येच 'निर्माल्य' संकलित करुन सहकार्य करण्याचे आवाहन महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे.

विसर्जनाच्या दिवशी आपत्कालीन सेवा म्हणून अनेक ठिकाणी बिनतारी संदेश यंत्रणेसह जीवरक्षक मोटरबोट्स, वैद्यकीय सेवा, रुग्णवाहिका इत्यादी सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात. यंदाही श्रीगणेशोत्सव मंडळांसोबत महानगरपालिकेच्या वतीने उत्तम समन्वय साधला जात आहे. ज्यामुळे मंडळांना आवश्यक परवाने वेळेत मिळण्यासोबतच आवश्यक त्या सोयी-सुविधा चांगल्याप्रकारे उपलब्ध होण्यास मदत होत आहे.

**१) विभाग पातळीवर समन्वय समिती :**

श्रीगणेशोत्सव सुरळीतपणे व शांततेने साजरा करण्यासाठी सर्व यंत्रणांसह जनतेकडून योग्य ती काळजी घेतली जाते. या समन्वयासाठी महानगरपालिकेच्या सर्व प्रशासकीय विभागांमध्ये स्वतंत्रपणे समन्वय समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. यात महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त व संबंधित अधिकारी, पोलीस अधिकारी, बृहन्मुंबई सार्वजनिक श्रीगणेशोत्सव समन्वय समितीचे प्रतिनिधी तसेच इतर संबंधित खात्याचे अधिकारी यांचा समावेश असतो. या काळात संबंधित सहाय्यक आयुक्त हे सुनियोजन व्यवस्थापन साधण्यासाठी आवश्यकतेनुसार समितीच्या बैठकांचे आयोजन करतात.

**२) मंडप बांधण्यासाठी परवानगी व आकार :**

२.१) मंडप बांधण्यासाठी परवानगी देण्याची प्रक्रिया साधारणपणे श्रीगणेशोत्सवाच्या अगोदर सुरू होते. मा. उच्च न्यायालयाच्या व महाराष्ट्र शासनाच्या विविध आदेशांच्या अधीन राहून श्रीगणेशोत्सव मंडळांना मंडपांसाठी ऑनलाइन परवानगी देण्यात येते. परवानगीसाठी महानगरपालिकेमार्फत प्रत्येक विभाग कार्यालयात 'एक खिडकी योजना' ऑनलाईन पध्दतीने सुरु करण्यात येते. मंडळांकडून अर्ज प्राप्त झाल्यापासून शक्य तितक्या लवकर व सामान्यपणे पाच दिवसांच्या आत मंडप बांधण्यासाठी परवानगी देण्याचा प्रयत्न असतो.

२.२) श्रीगणेशोत्सवासाठी नव्याने खासगी अथवा सार्वजनिक जागा हवी असल्यास ऑनलाइन 'एक खिडकी योजना'द्वारे स्थानिक पोलीस ठाणे, सहाय्यक पोलीस आयुक्त (वाहतूक) आणि संबंधित महानगरपालिका उप-आयुक्त यांची मान्यता घेणे आवश्यक असते.

२.३) सन १९९७ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार काही अटी आहेत. क्रीडांगणाच्या प्रयोजनार्थ राखून ठेवलेल्या, नामनिर्देशित केलेल्या किंवा वाटप केलेल्या राज्य शासनाच्या किंवा नियोजन प्राधिकरणाच्या ताब्यातील कोणत्याही भूखंडाच्या संबंधीत एकावेळी १२ दिवसांपेक्षा अधिक नसेल इतक्या मुदतीसाठी श्रीगणेशोत्सवाकरिता बांधण्यात येणाऱ्या मंडपाला सदर जागा देताना पूर्वस्थितीत करण्याच्या अटीसापेक्ष मंडळांना परवानगी देण्यात येते.

२.४) श्रीगणेशोत्सव मंडळांना विभाग कार्यालयांमार्फत परवानगी देण्यात येणार आहे. या परवानगीचे दरवर्षी ऑनलाइन नूतनीकरण करणे गरजेचे असेल. दिनांक १४ ऑगस्ट २०२६ पासून एक खिडकी योजनेनुसार संगणकीय प्रणालीद्वारे सार्वजनिक श्रीगणेशोत्सव मंडळांना मंडप उभारणीसाठी ऑनलाइन परवानगी देण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. सदर नोंदणीप्रक्रिया **https://portal.mcgm.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२.५) प्रतिबंध केलेल्या वस्तूंची आणि त्याचसदृश (प्रतिमा) जाहिरात लावण्यास श्रीगणेशोत्सव मंडळांना परवानगी देता येणार नाही. मंडपामध्ये जाहिराती लावू इच्छिणाऱ्या मंडळांकडून विहित शुल्क आकारण्यात येईल.

२.६) २५ फूटांपेक्षा अधिक उंची असलेल्या मंडपांच्या बांधणी स्थैर्यतेची **(Structural Stability)** हमी मंडळांकडून घेऊन त्यासाठी मंडळास जबाबदार धरण्यात येईल.

**३) पर्यावरणपूरक श्रीगणेशमूर्तीसाठी ९०० मेट्रिक टनांपेक्षा अधिक मोफत शाडू माती वाटप :-**

३.१) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात पर्यावरणपूरक पद्धतीने श्रीगणेशोत्सव साजरा व्हावा, यासाठी महानगरपालिकेने यावर्षी विशेष प्रयत्न सुरु केले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून मोफत शाडू मातीसाठी ४३३ पेक्षा अधिक मूर्तिकारांनी मागणी केली असून, त्यांना ९०० मेट्रिक टनांपेक्षा अधिक मोफत शाडू माती देण्यात आली आहे.

३.२) श्रीगणेशमूर्ती तयार करताना पर्यावरणाचा, उंचीचा विचार करणे आवश्यक आहे. मूर्ती रंगविताना काही वेळेस बंदी घातलेल्या रंगांचा वापर केला जातो. त्यामुळे तलावात/समुद्रात प्रदूषण तर होतेच, शिवाय अशा श्रीगणेशमूर्तींचे विघटन त्वरित होत नाही. त्यासाठी वेगळी व्यवस्था करावी लागते. त्यामुळे प्रत्येक मंडळाने श्रीगणेशमूर्ती खरेदी करताना ती मातीची अथवा पर्यावरणपूरक साहित्याने बनविली आहे, हे पाहूनच खरेदी करावी.

३.३) पर्यावरणपूरक श्रीगणेशोत्सवास प्रोत्साहन मिळावे, या हेतूने पर्यावरणपूरक मूर्ती तयार करणाऱ्या मूर्तिकारांसाठी विविध ठिकाणी निःशुल्क जागा उपलब्ध करुन दिली आहे. त्याचे वितरण प्रशासकीय विभागनिहाय 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर उपलब्धतेनुसार केले आहे.

**४) स्वच्छता व आरोग्य :-**

४.१) सार्वजनिक आरोग्याबाबत दक्ष राहून प्रत्येकाने आपल्या विभागात उंदीर, डास इत्यादींचा उपद्रव होणार नाही, याची काळजी घ्यावी. जेणेकरुन लेप्टोस्पायरोसिस व इतर साथीच्या रोगांचा फैलाव होणार नाही.

४.२) मोकळ्या जागेवरील माती, कचरा काढून टाकावा, जेणेकरुन श्रीगणेशोत्सवाच्या कालावधीत सार्वजनिक स्वच्छता राखली जाईल व आरोग्यास धोका निर्माण होणार नाही.

४.३) प्रत्येक श्रीगणेशोत्सव मंडळाने मंडपाचा परिसर, रस्ते व विसर्जनाची ठिकाणे स्वच्छ व सुंदर ठेवावीत. आवश्यकतेनुसार कचरा संकलित करण्याची स्वतंत्र व्यवस्था करावी.

४.४) मंडपात तसेच मंडपाच्या आजूबाजूच्या परिसरात महानगरपालिकेने तयार केलेली लोकोपयोगी भित्तिपत्रके, कापडी फलक तसेच इतर समाजोपयोगी माहितीपत्रके प्रदर्शित करावीत.

४.५) मंडपाच्या परिसरात आग विझविण्यासाठी सहज उपलब्ध होईल, अशा रितीने वाळू (रेती) बादल्या व पाण्याची व्यवस्था असावी. मंडपाजवळील अग्निशमन केंद्राचा संपर्क क्रमांक मंडळातील कार्यकर्त्यांकडे व पदाधिकाऱ्यांकडे असावा. मंडपामुळे खड्डे होणार नाहीत, याची दक्षता घ्यावी.

४.६) मंडपात तसेच विसर्जनाच्या वेळी भाविकांच्या सुरक्षा व्यवस्थेबाबत विशेष जागरुक असावे तसेच पोलिसांना सहकार्य करावे. आपत्कालीन नियंत्रण कक्ष यांचे संपर्क क्रमांक १९१६ / २२६९४७२५-२७ असे आहेत.

४.७) श्रीगणेशमूर्ती विसर्जनाच्या कालावधीत मावा व माव्याचा वापर करुन तयार केलेले पदार्थ खरेदी केले जातात. हे पदार्थ शिळे असल्यास त्यांच्या सेवनामुळे आजार उद्भवू शकतात. त्यामुळे ताज्या आणि खाण्यायोग्य पदार्थांची तपासणी करुन खरेदी व वाटप करावे. श्रीगणेशोत्सव साजरा होत असलेल्या परिसरात फेरीवाल्यांना खाद्यपदार्थांची विक्री करण्यास प्रतिबंध करावा. याबाबतीत काही मदत लागल्यास महानगरपालिकेच्या संबंधित विभागातील वरिष्ठ निरीक्षक (अनुज्ञापन खाते/ वैद्यकीय आरोग्य अधिकारी) यांच्याशी संपर्क साधावा.

**५) निर्माल्य व्यवस्थापन :-**

मागील काही वर्षांपासून श्रीगणेशोत्सव कालावधीत तयार होणाऱ्या निर्माल्यावर योग्य ती प्रक्रिया करुन खत तयार केले जाते. यामुळे समुद्र व तलावाचे प्रदूषण टळते. या निर्माल्य व्यवस्थापनेमध्ये सुसूत्रता आणण्यासाठी खालील सूचना देण्यात येत आहेत.

५.१) प्रत्येक मंडळाने श्रीगणेशोत्सव कालावधीत तयार होणारे निर्माल्य व तत्सम पदार्थ साठवून ठेवण्यासाठी व्यवस्था करावी. निर्माल्याचे व्यवस्थित वर्गीकरण करावे. तसेच, ज्यापासून खत तयार करता येऊ शकत नाही, असे पदार्थ वेगळ्या डब्यात जमा करावे. संकलित होणारे निर्माल्य हे महानगरपालिकेच्या निर्माल्य वाहून नेणाऱ्या वाहनात हस्तांतरित करावे.

५.२) वाहन पोहोचण्यास अडथळा असलेल्या ठिकाणच्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने / नागरिकांनी महानगरपालिकेच्या वाहनाला सोईचे होईल, अशा ठिकाणी एकत्रितपणे निर्माल्य संकलित करुन ठेवावे.

**६) पर्यावरणपूरक गणेशोत्सव :-**

६.१) शाडू मातीपासून बनविलेल्या मूर्तीची स्थापना करावी.

६.२) आरास करण्यासाठी पर्यावरणपूरक बाबींचा वापर करावा. तसेच थर्माकोल, प्लास्टर ऑफ पॅरिस, प्लास्टिक अशा विघटन न होणाऱ्या वस्तू /पदार्थांचा वापर टाळावा.

६.३) श्रीगणेशमूर्तींचे विसर्जन करण्यासाठी कृत्रिम तलावांना प्राधान्य द्यावे किंवा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या श्रीगणेशमूर्ती संकलन केंद्रात मूर्ती जमा कराव्यात.

**७) पर्यावरणपूरक उत्सवाला हातभार :-**

श्रीगणेशोत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा व्हावा, यासाठी कृत्रिम तलावांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यासाठी महानगरपालिकेने संपूर्ण बृहन्मुंबईत एकूण २७८ ठिकाणे मिळून ३८३ हून अधिक कृत्रिम तलावांची उभारणी केली आहे. यातून पर्यावरणपूरक उत्सवाला हातभार लागणार आहे. नागरिकांनी कृत्रिम तलावात श्रीगणेशमूर्ती विसर्जित कराव्यात, असे आवाहन बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे.

**८) श्रीगणेशमूर्ती विसर्जन :-**

८.१) मुंबई महानगरातील श्रीगणेशोत्सव अधिकाधिक पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा व्हावा, यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासन श्रीगणेशमूर्ती घडविणाऱ्या मूर्तिकारांना शाडूची माती पुरविणे, त्यांना जागा उपलब्ध करून देणे, मूर्ती विसर्जनासाठी कृत्रिम तलाव तयार करणे आणि पर्यावरणपूरक श्रीगणेशोत्सवाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने 'श्रीगणेश गौरव स्पर्धा' आयोजित करणे यासारखे विविध उपक्रम राबवित असते. याच श्रृंखलेत यंदा नागरिकांना मुंबईतील कृत्रिम तलावांच्या ठिकाणांची माहिती सहजपणे उपलब्ध व्हावी, या उद्देशाने 'जीपीएस लोकेशन्स'सह असलेली कृत्रिम तलावांची यादी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येत आहे. विशेष म्हणजे या यादीचा 'क्यू आर कोड' जनसंपर्क विभागाद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या माहिती पुस्तिकेसह विविध ठिकाणी प्रदर्शित करण्यात आलेला आहे.

८.२) मुंबई महानगरात एकूण ६७ नैसर्गिक विसर्जन स्थळे आहेत. तसेच, यावर्षी ३८३ पेक्षा अधिक ठिकाणी कृत्रिम विसर्जन स्थळेही असणार आहेत. विभाग स्तरावर फिरती विसर्जन स्थळे/श्रीगणेशमूर्ती संकलन केंद्रे देखील तयार करण्यात आली आहेत.

८.३) चौपाट्यांवर श्रीगणेशमूर्ती विसर्जनाच्या ठिकाणी भरती व ओहोटीची वेळ, लाटांची उंची नमूद करणारा फलक प्रदर्शित केला जाईल. सदर ठिकाणी देण्यात येणाऱ्या तसेच महानगरपालिका आणि पोलिसांकडून प्राप्त होणाऱ्या सूचनांचे तंतोतंत पालन करावे.

८.४) विसर्जनाच्या ठिकाणी महानगरपालिका तसेच स्वयंसेवी संस्थांमार्फत वैद्यकीय सेवा, पिण्याचे पाणी, शौचालये, आपत्कालीन व्यवस्था इत्यादी सेवा-सुविधा उपलब्ध केल्या जातात. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विभागवार विसर्जन स्थळांची, तेथे उपलब्ध असलेल्या सेवा-सुविधा इत्यादी बाबतची माहिती या पुस्तिकेत समाविष्ट आहे.

८.५) विसर्जनाच्या कालावधीत महानगरपालिकेच्या सेवा-सुविधांबाबत काही अडचणी आल्यास विभागातील नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा अथवा या पुस्तिकेत नमूद केलेल्या संबंधित नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा.

८.६) जेथे मोठ्या प्रमाणात श्रीगणेशमूर्तींचे विसर्जन होते, अशा ठिकाणी महानगरपालिकेकडून विसर्जनाच्या दिवशी बिनतारी संदेश यंत्रणांसहित नियंत्रण कक्षाची स्थापना करण्यात येते. आपत्कालीनप्रसंगी या सेवेचा अवश्य उपयोग करावा. तसेच या पुस्तिकेत नमूद केलेल्या दूरध्वनीवर अथवा महानगरपालिका मुख्यालयातील आपत्कालीन नियंत्रण कक्षाशी १९१६ या मदतसेवा क्रमांकावर संपर्क साधावा.

८.७) महानगरपालिकेद्वारे नागरिकांना असे आवाहन करण्यात येत आहे की, त्यांनी विसर्जनापूर्वीची पूजा, आरती आदी विधी प्राधान्याने घरीच पूर्ण करावे. मार्गदर्शक सूचनांचे पालन करुन गर्दी न करता संकलन केंद्रात श्रीगणेशमूर्ती जमा करावी किंवा कृत्रिम तलावात विसर्जित करावी.

८.८) नैसर्गिक विसर्जनाचे ठिकाण, कृत्रिम तलावाचे ठिकाण आणि मूर्ती संकलन केंद्र या ठिकाणी उपस्थित असलेले बृहन्मुंबई महानगरपालिका कर्मचारी यांच्याकडे आपली श्रीगणेशमूर्ती द्यावी व त्यानंतर महानगरपालिकेतर्फे श्रीगणेशमूर्तींचे सन्मानपूर्वक विसर्जन करण्यात येईल.

## सन २०२५ मध्ये २९८ कृत्रिम तलावांत विसर्जित करण्यात आलेल्या मूर्तींची एकूण संख्या

| | | |
|---|---|---|
| सार्वजनिक - | ९,८५२ | श्रीगणेशमूर्ती |
| घरगुती - | ४,९७२ | गौरी मूर्ती |
| | १,७३,५६३ | श्रीगणेशमूर्ती |
| एकूण - | १,८८,३८७ | एकूण मूर्ती |

# ‘प्लास्टर ऑफ पॅरिस’ (पीओपी) मूर्ती विसर्जनासाठी महाराष्ट्र शासनातर्फे मार्गदर्शक सूचना

**मा. उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र. १६/२०२४ व इतर न्यायालयीन प्रकरणे यामध्ये दिनांक ९ जून २०२५ व दिनांक २४ जुलै २०२५ रोजी दिलेल्या आदेशानुसार, पर्यावरणपूरक सण साजरे करण्याकरिता ‘प्लास्टर ऑफ पॅरिस’ (पीओपी) मूर्ती विसर्जनाबाबतच्या दिनांक २१ जुलै २०२५ रोजीच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये आवश्यक सुधारणा करून सुधारित एकत्रित मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत. सदरच्या मार्गदर्शक सूचना केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या दिनांक १२ मे २०२० रोजीच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद केलेल्या बाबींमध्ये अधिकच्या स्वरुपात महाराष्ट्र राज्याकरीता समाविष्ट राहतील.**

१) ‘प्लास्टर ऑफ पॅरिस’ (पीओपी) मूर्तीचे उत्पादक व विक्रेते यांनी मूर्ती विक्री करताना मूर्तीच्या मागील बाजूस, स्पष्टपणे दिसेल अशा स्वरुपाचे ऑईल पेंटने लाल रंगाने गोल आकाराचे चिन्ह करावे. याबाबत आवश्यक त्या सूचना संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी उत्पादक व विक्रेत्यांना द्याव्यात. याची काटेकोरपणे अंमलबजावणी होईल, याबाबत आवश्यक ती दक्षता घ्यावी.

२) ‘प्लास्टर ऑफ पॅरिस’ (पीओपी) मूर्ती बनविणारे मूर्तिकार व मूर्ती विक्रेत्यांना सदर मूर्तीची विक्री करताना याबाबतची नोंदवही ठेवणे बंधनकारक राहील, याचा समावेश संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी ‘प्लास्टर ऑफ पॅरिस’ (पीओपी) मूर्ती बनविणारे मूर्तिकार व विक्रेते यांना परवाना प्रदान करताना त्यामध्ये करण्यात यावा.

३) मूर्ती विक्रेत्याने ‘प्लास्टर ऑफ पॅरिस’ (पीओपी) मूर्ती समवेत मूर्ती विसर्जनाबाबतची माहिती देणारी माहितीपत्रिका ग्राहकास द्यावी. संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी सदरच्या माहितीपत्रिका संबंधित विक्रेत्यांना उपलब्ध करून द्याव्यात.

४) संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या हद्दीतील सार्वजनिक मंडळांना नोंदणीसाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करून मंडळांची नोंदणी करताना सदर मंडळांकडून बसविण्यात येणाऱ्या मूर्तीबाबतची आवश्यक सर्व माहिती, पीओपी मूर्ती आहे की नाही यासह संकलित करून त्यानुसार विसर्जनाचा आराखडा व व्यवस्था निर्माण करावी.

५) स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या हद्दीतील सार्वजनिक मंडळांना लहान आकाराच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्याबाबत प्रोत्साहन द्यावे. तसेच सार्वजनिक मंडळामार्फत मोठ्या आकाराच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आल्यास सदर मूर्तीच्या ऐवजी विसर्जनासाठी प्रतिकात्मक स्वरुपात लहान मूर्तीचा वापर करणेबाबत प्रोत्साहित करावे. तसेच प्रतिष्ठापित मोठ्या मूर्तीचा वापर पुढील वर्षी करण्याकरीता देखील प्रोत्साहन द्यावे.

६) ‘प्लास्टर ऑफ पॅरिस’ (पीओपी) मूर्तीचे उत्पादक व विक्रेते यांनी ‘प्लास्टर ऑफ पॅरिस’ (पीओपी) पासून बनविण्यात येणाऱ्या घरगुती उत्सवांच्या, तसेच **सहा फुटापेक्षा कमी** उंचीच्या इतर सर्व मूर्ती केवळ कृत्रिम तलावातच विसर्जित कराव्यात. याबाबत आवश्यक देखरेख व संनियंत्रण संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी करावे.

७) सार्वजनिक मंडळाच्या **सहा फुटापेक्षा जास्त** उंचीच्या मूर्तीचे विसर्जन, जर त्यांना विसर्जनासाठी इतर कोणताही पर्याय उपलब्ध नसेल तर, सदर मूर्ती नैसर्गिक जलस्त्रोतात विसर्जित करण्याची त्यांना परवानगी असेल. तथापि, सदर मूर्ती (प्लास्टर ऑफ पॅरिस) पाण्यात लवकर विरघळत नसल्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांनी विसर्जनानंतर दुसऱ्या दिवशीच सर्व विसर्जित साहित्याचे संकलन आणि योग्य विल्हेवाटीची दक्षता घ्यावी. स्थानिक स्वराज्य संस्था स्वतः किंवा विशेष एजन्सींच्या मदतीने समुद्रतळ किंवा मूर्ती विसर्जित केलेल्या नैसर्गिक जलस्रोतांची साफसफाई करणे सुनिश्चित करावे. तसेच संकलित मूर्तीचे शास्त्रोक्त पद्धतीने पुनर्वापर किंवा पुनर्प्रक्रिया संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेने मार्गदर्शक सुचनेप्रमाणे करावे.

८) स्थानिक स्वराज्य संस्थांनी मूर्ती विसर्जनासाठी योग्य आकाराचे कृत्रिम तलाव बांधावे व त्याची माहिती वर्तमानपत्रे, सोशल मीडियाद्वारे, संकेतस्थळ व इतर माध्यमांतून जनतेपर्यंत पोहोचवावी. तसेच शाळा, महाविद्यालये व सार्वजनिक ठिकाणी जनजागृती कार्यक्रम, पथनाट्ये इत्यादींचे आयोजन करावे.

९) स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या हद्दीमध्ये ‘प्लास्टर ऑफ पॅरिस’ (पीओपी) मूर्ती विसर्जनासाठी तयार करण्यात आलेल्या कृत्रिम तलावाकडे जाणाऱ्या मार्गावर आवश्यक तेथे दिशादर्शक फलक लावावेत.

१०) स्थानिक स्वराज्य संस्थांनी विसर्जनापूर्वी इतर निर्माल्य स्वतंत्रपणे संकलित करण्याची व्यवस्था कृत्रिम तलावाशेजारी निर्माण करून संकलित करण्यात आलेल्या निर्माल्यावर पर्यावरणपूरक प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर किंवा पुनर्निर्मितीसाठी वापर करण्यात यावा.

११) स्थानिक स्वराज्य संस्था क्षेत्रांमध्ये तयार करण्यात आलेल्या कृत्रिम तलावांमधील पाणी मूर्तीच्या अपेक्षित पाणी क्षमतेच्या ८-१० पट असावे. कृत्रिम तलावांमध्ये 'प्लास्टर ऑफ पॅरिस' (पीओपी) मूर्ती विसर्जित केल्यानंतर ७ दिवसामध्ये कृत्रिम तलावातील पाणी त्याच स्थळी चुन्याच्या किंवा तुरटीच्या सहाय्याने प्रक्रिया करुन, प्रक्रिया केलेले पाणी नजीकच्या शुद्धीकरण केंद्राकडे पाठवून व त्यावर आवश्यक ती प्रक्रिया करुन सदर पाण्याचा विसर्ग करण्यात यावा. सदर विसर्ग करताना सदरचा विसर्ग हा पिण्याच्या पाण्याचा स्रोत असलेल्या ठिकाणी होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

१२) स्थानिक स्वराज्य संस्था क्षेत्रामध्ये 'प्लास्टर ऑफ पॅरिस' (पीओपी) मूर्ती विसर्जनासाठी तयार करण्यात आलेल्या कृत्रिम तलावामध्ये जमा झालेल्या गाळाची साठवण पर्यावरणपूरक पध्दतीने १५ दिवसांपर्यंत करून त्याचा उपयोग पुनर्वापर व पुनर्निमितीसाठी करण्याबाबत स्थानिक स्वराज्य संस्थांनी आवश्यक ती उपाययोजना करावी.

१३) स्थानिक स्वराज्य संस्थांनी विविध पर्यावरणवादी संस्था व स्वयंसेवी संस्था (एन. जी. ओ.) ज्या 'प्लास्टर ऑफ पॅरिस' (पीओपी) मूर्ती संकलित करून त्यांचा पुनर्वापर व पुनर्प्रक्रिया शास्त्रीयदृष्ट्या करतील अशा संस्थांना आवाहन करून त्यांच्याशी याबाबत आवश्यक करारनामा करावा. सदर करारनाम्यातील अटी व शर्तीमध्ये केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक सूचना व मा. उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचा स्पष्टपणे उल्लेख करण्यात यावा.

१४) स्थानिक स्वराज संस्थांनी विसर्जनानंतर कृत्रिम तलावामध्ये जमा होणारा गाळ व पाणी यावर प्रक्रिया करून त्याचा वापर / पुनर्वापर करण्याकरीता या क्षेत्रामध्ये कार्यरत वैज्ञानिक व तांत्रिक संस्था उदाहरणार्थ राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा (एनसीएल) पुणे, राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग, मुंबई इत्यादी संस्थांशी करारनामा करून त्यांच्या मार्गदर्शनानुसार कृत्रिम तलावातील गाळ व पाण्याचा विसर्ग शास्त्रोक्त पध्दतीने करण्याबाबत आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात.

१५) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने राज्यामध्ये संपूर्ण वर्षभर साजरे करण्यात येणारे सण उत्सव पर्यावरणपूरक साजरे करण्याबाबत जनजागृतीसाठी प्रचार मोहीम राबवावी, त्याबाबतचा मीडिया प्लॅन तयार करून अंमलबजावणी करावी.

१६) सर्व स्थानिक स्वराज्य संस्था व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB) संयुक्तरित्या राज्यभरात कृत्रिम तलावांमध्ये विसर्जनासाठी पर्यावरणपूरक मूर्ती तयार करण्यास प्रोत्साहन देणारी व्यापक जनजागृती मोहीम राबवावी. तसेच, 'प्लास्टर ऑफ पॅरिस' (POP) मूर्तीविषयीच्या मार्गदर्शक सूचनांची प्रभावी जनजागृती विविध माध्यमांद्वारे सोशल मीडिया, पारंपरिक माध्यमे आणि माहिती व जनसंपर्क संचालनालयाच्या सहकार्याने अंमलात आणली जाईल.

१७) सदर मार्गदर्शक सूचना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात याव्यात. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर मार्गदर्शक सूचनांची कार्यनियमावली तयार करून प्रसारित करावी.

१८) स्थानिक स्वराज्य संस्थांनी सदर मार्गदर्शक सूचनांची काटेकार अंमलबजावणी होईल. तसेच सदर मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी करताना मा. उच्च न्यायालयाचे वेळोवेळी दिलेल्या आदेशांचे पालन होईल, याबाबत आवश्यक दक्षता घ्यावी.



आगामी श्रीगणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर महानगरपालिका मुख्यालयात माननीय महापौर श्रीमती रितू तावडे, माननीय उप महापौर श्री. संजय घाडी यांच्या अध्यक्षतेखाली समन्वय बैठक पार पाडली.

श्रीगणेशोत्सवाच्या काळात वाहतूक व्यवस्था, सुरक्षा नियोजन तसेच विविध कामांचा आढावा, विसर्जनाबाबतचा आढावा या बैठकीत घेण्यात आला. तसेच श्रीगणेशमूर्ती आगमन सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर वाहतूक नियंत्रण, सुरक्षा व्यवस्था आणि आवश्यक उपाययोजनांबाबतही चर्चा करण्यात आली.

सभागृह नेता श्री. गणेश खणकर, शिवसेना गटनेता श्री. अमेय घोले, एआयएमआयएम गटनेता श्री. विजय उबाळे, महाराष्ट्र नवनिर्माण सेना गटनेता श्री. यशवंत किल्लेदार, समाजवादी पक्षा गटनेता श्रीमती अमरिन अब्रहानी, स्थायी समिती अध्यक्ष श्री. प्रभाकर शिंदे, सुधार समिती अध्यक्ष श्रीमती संध्या दोशी-सक्रे, बेस्ट समिती अध्यक्ष श्रीमती तृष्णा विश्वासराव, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) श्रीमती प्राजक्ता वर्मा-लवंगारे, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) डॉ. विपिन शर्मा, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) श्री. अभिजित बांगर, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अविनाश ढाकणे, सर्व परिमंडळांचे उप आयुक्त, विविध विभागांचे व प्राधिकरणांचे अधिकारी, उप आयुक्त (परि. -२) तथा गणेशोत्सव समन्वयक श्री. प्रशांत सपकाळे यांच्यासह विविध गणेशोत्सव समित्यांचे पदाधिकारी उपस्थित होते.

# बाप्पाची मूर्ती घडविताना निसर्गाचीही काळजी घ्या!

**- मूर्तिकार शैलेश चव्हाण**

गणपती बाप्पाची मूर्ती घडविणे ही केवळ एक कला नाही, तर ती श्रद्धा आणि जबाबदारीही आहे. मूर्ती घडवताना ज्या बाप्पाला आपण भक्तिभावाने आकार देतो, आपल्या लाडक्या बाप्पाच्या मूर्तीचे विसर्जन निसर्गात होणार आहे, याचे भान प्रत्येक मूर्तिकाराने आणि गणेशभक्ताने ठेवायला हवे. म्हणूनच मूर्ती घडविताना कलात्मकतेसोबतच पर्यावरणाचाही विचार करणे ही आजच्या काळाची गरज आहे.



मी शैलेश चव्हाण, गेल्या अनेक वर्षांपासून गणपतीच्या मूर्ती घडविण्याचे काम करीत आहे. बाप्पाचे रूप साकारताना प्रत्येक वेळी एक वेगळा अनुभव मिळतो. भक्तांच्या मनात असलेले बाप्पाचे रूप आपल्या हातातून प्रत्यक्षात उतरविणे ही माझ्यासाठी आनंदाची आणि समाधानाची बाब आहे. मूर्ती लहान असो वा मोठी, साधी असो वा देखणी, ती घडविताना माझ्या मनात नेहमीच बाप्पाप्रती श्रद्धा आणि कामाप्रती प्रामाणिकपणा असतो. गतवर्षी सन २०२५ शिवाजी पार्क सार्वजनिक श्रीगणेशोत्सव मंडळ, माहीम येथील श्रीगणेशमूर्तीला बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या 'श्रीगणेश गौरव पुरस्कार' स्पर्धेत शाडू मातीच्या सर्वोत्कृष्ट मूर्तीचा पुरस्कार मिळाला, हा माझ्यासाठी अत्यंत आनंदाचा आणि अभिमानाचा क्षण आहे. या पुरस्काराचे श्रेय माझ्या कलेसोबत मंडळाच्या कार्यकर्त्यांना आणि पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला प्रोत्साहन देणाऱ्या प्रत्येक व्यक्तिला जाते.

मूर्ती घडविण्यासाठी शाडू मातीची निवड करण्यामागे केवळ परंपरा नाही, तर पर्यावरणाची जाणीव आहे. श्रीगणेशमूर्ती ही भक्तांच्या श्रद्धेचे प्रतीक आहे. त्यामुळे तिच्या निर्मितीपासून विसर्जनापर्यंतचा प्रवास पर्यावरणपूरक असणे आवश्यक आहे. शाडू मातीपासून तयार केलेली मूर्ती पाण्यात सहजपणे विरघळते. त्यामुळे विसर्जनानंतर जलप्रदूषणाचा धोका कमी होतो आणि जलचर सृष्टीचेही संरक्षण होते. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींच्या तुलनेत शाडू मातीची मूर्ती घडविण्यासाठी अधिक कौशल्य आणि संयमाची आवश्यकता असते. शाडू माती हाताळताना तिचा पोत, ओलावा आणि आकार यांचा सातत्याने विचार करावा लागतो. मूर्तीचा प्रत्येक भाग काळजीपूर्वक घडवावा लागतो.

मुंबईसारख्या महानगरात पर्यावरणाचा समतोल राखणे ही आपल्या सर्वांचीच जबाबदारी आहे. श्रीगणेशोत्सव हा मुंबईच्या सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग आहे. त्यामुळे या उत्सवाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्याची संधी आपल्याला मिळते. प्रत्येक गणेशभक्ताने आपल्या बाप्पासाठी पर्यावरणपूरक मूर्तींची निवड केली, तर त्याचा सकारात्मक परिणाम संपूर्ण महानगरावर होऊ शकतो. बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे पर्यावरणपूरक श्रीगणेशात्सवाला दिले जाणारे प्रोत्साहन आणि शाडू मातीच्या मूर्तींना दिला जाणारा सन्मान यामुळे मूर्तिकारांना अधिक चांगले काम करण्याची प्रेरणा मिळते. 'श्रीगणेश गौरव पुरस्कार' सारख्या उपक्रमांमुळे पर्यावरणपूरक मूर्ती घडविणाऱ्या मूर्तिकारांना प्रोत्साहन मिळते.




गणेशभक्तांनी बाप्पाची मूर्ती निवडताना केवळ तिचे रुप आणि आकार न पाहता ती कोणत्या साहित्यापासून तयार केली आहे, याचाही विचार करावा. शाडू मातीच्या मूर्तीला प्राधान्य द्यावे. शक्य असल्यास नैसर्गिक रंगांचा वापर झालेल्या मूर्तींची निवड करावी. मूर्ती घडविताना माझ्या मनात नेहमी एक विचार असतो, बाप्पा आपल्या घरी येतात, भक्तांना आनंद देतात आणि काही दिवसांनी निसर्गातच विलीन होतात. त्यामुळे त्यांचे आगमन जितक्या भक्तिभावाने होते, तितक्याच जबाबदारीने त्यांना निसर्गाच्या कुशीत परत पाठविले पाहिजे. शाडू मातीची मूर्ती म्हणजे केवळ पर्यावरणपूरक पर्याय नाही; ती आपल्या श्रद्धेला निसर्गसंवर्धनाची जोड देणारी निवड आहे. बाप्पा घडवताना निसर्ग जपूया आणि बाप्पाला निरोप देतानाही निसर्गाचे आशीर्वाद कायम ठेवूया.

**शैलेश चव्हाण, मूर्तिकार**
**शिवाजी पार्क (हाऊस) सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, माहीम**
**(श्री गणेश गौरव पुरस्कार २०२५ या स्पर्धेतील शाडू मातीच्या सर्वोत्कृष्ट मूर्तीचे मूर्तिकार)**

# सलग दुसऱ्या वर्षी पर्यावरणपूरक आणि समाजोपयोगी उपक्रमांची परंपरा जपणारे स्वप्नाक्षय मित्र मंडळ !

लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी सार्वजनिक श्रीगणेशोत्सवाच्या माध्यमातून समाजाला एकत्र आणण्याची जी परंपरा सुरू केली, ती आजच्या काळात अधिक व्यापक सामाजिक जबाबदारीने पुढे नेणे आवश्यक आहे. याच विचारातून आम्ही स्वप्नाक्षय मित्र मंडळ श्रीगणेशोत्सव साजरा करतो. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पर्यावरणपूरक श्रीगणेश गौरव स्पर्धेने सार्वजनिक श्रीगणेशोत्सव मंडळांना सामाजिक आणि पर्यावरणपूरक उपक्रमांसाठी प्रोत्साहन देण्याचे महत्त्वपूर्ण काम केले आहे. सन २०२४ मध्ये आमच्या मंडळाने या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. त्यानंतर मिळालेल्या प्रोत्साहनातून अधिक चांगले काम करण्याची प्रेरणा मिळाली आणि सन २०२५ मध्येही आम्ही प्रथम क्रमांक मिळवला. सलग दोन वर्षे मिळालेला हा सन्मान आमच्यासाठी आनंदाचा क्षण असला, तरी त्यापेक्षा महत्त्वाचे म्हणजे या पुरस्कारामुळे आमची सामाजिक जबाबदारी आणखी वाढली आहे.



श्रीगणेशमूर्तीपासून मंडप, सजावट, विद्युत रोशणाई, ध्वनिव्यवस्था आणि विसर्जनापर्यंत प्रत्येक बाबतीत पर्यावरणाचा विचार केला जातो. शाडू मातीच्या मूर्तींची प्रतिष्ठापना, पर्यावरणपूरक सजावटीचे साहित्य, एलईडी दिव्यांचा वापर आणि ध्वनी प्रदूषण संदर्भातील नियमांचे काटेकोर पालन यावर आमचा विशेष भर असतो. श्रीगणेशोत्सवात मोठ्या प्रमाणावर नागरिक सहभागी होत असल्याने या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश अधिक प्रभावीपणे समाजापर्यंत पोहोचविता येतो. त्यामुळे प्लास्टिकचा कमीतकमी वापर, ई-वेस्ट संकलन, स्वच्छता, वृक्षसंवर्धन आणि टाकाऊ वस्तुंच्या पुनर्वापराला प्रोत्साहन देणारे उपक्रम आम्ही सातत्याने राबवितो. उत्सव संपल्यानंतरही या उपक्रमांची भावना वर्षभर कायम राहावी, यासाठी आमचे कार्यकर्ते प्रयत्नशील असतात.

आमच्या मंडळाच्या माध्यमातून विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले जातात. ज्येष्ठ नागरिकांसाठी मदतीचा हात देण्याबरोबरच एकाकी जीवन जगणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना मंडळाच्या सदस्यांनी दत्तक घेतले आहे. त्यांच्या गरजेच्या वेळी मदत करणे, त्यांच्याशी संवाद साधणे आणि त्यांना आपलेपणाची भावना देणे, ही आमची सामाजिक जबाबदारी आहे. त्याचप्रमाणे ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत ग्रंथालय, छत्री वाटप आणि विविध आरोग्यविषयक उपक्रम राबविले जातात.

गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांपर्यंत मदत पोहोचविण्यासाठी रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी शिबिर, डोळे तपासणी व मोफत चष्मे वाटप, तसेच गरजू विद्यार्थ्यांना मोफत वह्या-पुस्तकांचे वाटप असे उपक्रमही राबविले जातात. मोफत रुग्णवाहिका सेवा हीदेखील मंडळाच्या सामाजिक बांधिलकीचे महत्त्वपूर्ण उदाहरण आहे. लहान मुलांमध्ये सामाजिक आणि सांस्कृतिक जाणीव निर्माण व्हावी, त्यांच्यातील कलागुणांना वाव मिळावा यासाठी चित्रकला, निबंध, फॅन्सी ड्रेस आणि नृत्य स्पर्धांचे आयोजन केले जाते.




सलग दोन वर्षे मिळालेला श्री गणेश गौरव पुरस्कार हा आमच्यासाठी केवळ एक पुरस्कार नसून, आमच्या कार्यकर्त्यांच्या मेहनतीची आणि नागरिकांच्या सहकार्याची पावती आहे. या सन्मानामुळे आमची जबाबदारी अधिक वाढली आहे. यापुढेही पर्यावरण संवर्धन आणि समाजोपयोगी उपक्रमांची ही परंपरा अधिक व्यापक करण्याचा आमचा प्रयत्न राहील. "उत्सव बाप्पाचा, संकल्प पर्यावरणाचा आणि व्रत घेतले समाजसेवेचे" या भावनेतून यंदाचाही श्रीगणेशोत्सव साजरा करण्याचा निर्धार आहे.

**देवेंद्र (बाळा) आंबेरकर**
**अध्यक्ष, स्वप्नाक्षय मित्र मंडळ, सातबंगला, अंधेरी (पश्चिम)**

**राजेश ढेरे**
**कार्याध्यक्ष, स्वप्नाक्षय मित्र मंडळ, सातबंगला, अंधेरी (पश्चिम)**

**(श्रीगणेश गौरव पुरस्कार २०२४ व २०२५ या स्पर्धेतील प्रथम पुरस्कार विजेते मंडळ)**

## बृहन्मुंबई महानगरपालिका

# श्रीगणेश गौरव पुरस्कार २०२६

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जनसंपर्क विभागातर्फे दरवर्षी श्रीगणेश गौरव स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. यंदा स्पर्धेचे ३७ वे वर्ष आहे. श्रीगणेशमूर्तीची सुबकता, तिच्या सभोवतालची आरास, त्यासाठी निवडलेल्या विषयाचा आशय, त्याची मांडणी, मंडळाने केलेली सामाजिक-विधायक कार्ये, परिसर स्वच्छता, सार्वजनिक श्रीगणेशोत्सव मंडळाने उत्सवाच्या काळात महानगरपालिकेच्या स्वच्छता मोहिमेला दिलेला प्रतिसाद, स्वच्छता, पर्यावरण आदी जनहिताचे संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी केलेली विशेष कार्ये इत्यादी बाबी विचारात घेतल्या जातात. निवड समितीने शिफारस केलेल्या विजेत्या मंडळांना खालीलप्रमाणे पुरस्कार देण्यात येतात.

**क)** १) प्रथम पुरस्कार रु.७५,०००/- २) द्वितीय पुरस्कार रु.५०,०००/- ३) तृतीय पुरस्कार रु. ३५,०००/-

**ख)** वैयक्तिक पुरस्कार १) सर्वोत्कृष्ट मूर्तिकार रु. २५,०००/- २) सर्वोत्कृष्ट सजावटकार रु. २०,०००/-

**ग)** दोन उत्तेजनार्थ पुरस्कार : प्रत्येकी रु.१०,०००/-) **घ)** शाडू मातीची सर्वोत्कृष्ट मूर्ती पुरस्कार रु. २५,०००/-

**च)** सामाजिक कार्य / समाज कार्य / अवयवदान जागृती : पुरस्कार रु. १५,०००/-

**छ)** प्लास्टिक बंदी / थर्माकोल बंदी / पर्यावरण विषयक जनजागृती उत्तेजनार्थ दोन पुरस्कार : प्रत्येकी रु. १०,०००/-

कृपया स्पर्धेचा प्रवेश अर्ज पुढील पत्त्यावर कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व कार्यालयीन वेळेत सादर करावा :-

**जनसंपर्क विभाग, तळ मजला, विस्तारित इमारत, बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय, महापालिका मार्ग, मुंबई - ४०० ००१**

अर्ज सादर करण्याची **शेवटची तारीख :- शुक्रवार, दिनांक ११ सप्टेंबर २०२६** रोजी सायंकाळी ४ वाजेपर्यंत.

**स्पर्धेचे नियम :-**

१. ज्या श्रीगणेशोत्सव मंडळांची नोंदणी धर्मादाय आयुक्तांकडे आहे, त्यांनाच या स्पर्धेत सहभागी होता येईल.
२. नोंदणीकृत श्रीगणेशोत्सव मंडळांनी यापूर्वी किमान पाच वर्षे गणेशोत्सव साजरा केलेला असावा.
३. ज्यांच्याकडे महानगरपालिका, वीज वितरण कंपन्या, पोलीस खाते यांचे उत्सव साजरा करण्यासाठी आवश्यक असलेले परवाने आहेत, अशी मंडळेच या स्पर्धेत भाग घेऊ शकतील.

या स्पर्धेसाठी नियुक्त केलेल्या तज्ज्ञांची निवड समिती, स्पर्धेत भाग घेण्यास पात्र असणाऱ्या सार्वजनिक श्रीगणेशोत्सव मंडळांना पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार भेट देऊन अंतिम फेरीनंतर स्पर्धेचा निकाल बंद लिफाफ्यात महानगरपालिका प्रशासनाला सादर करतील. दरवर्षी श्रीगणेशोत्सव सुरळीतपणे पार पाडण्यासाठी वर नमूद केलेल्या सूचनांचे पालन बृहन्मुंबईतील श्रीगणेशोत्सव मंडळांनी व जनतेने योग्य प्रकारे करावे, ही नम्र विनंती.

**समन्वयक :-** बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे श्री. प्रशांत सपकाळे, उप आयुक्त (परिमंडळ - २) यांची श्रीगणेशोत्सवासाठी समन्वयक म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. त्यांचा पत्रव्यवहाराचा पत्ता पुढीलप्रमाणे आहे

उप आयुक्त (परिमंडळ - २) यांचे कार्यालय, 'एफ दक्षिण' विभाग कार्यालय इमारत, तिसरा मजला, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग, परळ, मुंबई - ४०० ०१२ (दूरध्वनी : ०२२-२४१३ ४५६०)



'श्रीगणेश गौरव पुरस्कार २०२५' या स्पर्धेमध्ये
शाडू मातीची सर्वोत्कृष्ट ठरलेली श्रीगणेशमूर्ती

## बृहन्मुंबई महानगरपालिका

# श्रीगणेश गौरव पुरस्कार २०२६

## प्रवेश अर्ज

जनसंपर्क विभाग, तळ मजला, विस्तारित इमारत,
महानगरपालिका मुख्यालय, महापालिका मार्ग, मुंबई - ४०० ००१
दूरध्वनी : ०२२-२२६२०२५१ (विस्तारित क्रमांक ४८६५)

**(अर्ज शुक्रवार, दि. ११/०९/२०२६ रोजी सायं. ४ वाजेपर्यंत संपूर्ण माहितीसह जनसंपर्क कार्यालयात सादर करावा)**

१) श्रीगणेशोत्सव मंडळाचे नाव व पूर्ण पत्ता : ( उत्सव स्थळाजवळील ठळक खूण व प्रसिद्ध ठिकाण लिहावे.)

___

___

___

२) श्रीगणेशोत्सव मंडळाचा ई-मेल आयडी :

३) श्रीगणेशोत्सव मंडळाचे स्थापना वर्ष :

४) धर्मादाय आयुक्तांकडील न्यास नोंदणी क्रमांक :

५) मंडळाच्या दोन जबाबदार पदाधिकाऱ्यांची नावे, हुद्दा, पत्रव्यवहारासाठी पत्ता व संपर्क क्रमांक :

**क)** ___

**भ्रमणध्वनी क्रमांक** ___

**ई-मेल आयडी** ___

**ख)** ___

**भ्रमणध्वनी क्रमांक** ___

**ई-मेल आयडी** ___

६) पुरस्कार घोषित झाल्यास धनादेश कोणाच्या नावे काढावा ?

___

७) मूर्तिकाराचे नाव - पत्ता व भ्रमणध्वनी क्रमांक (हा रकाना पूर्ण भरावा )

___

___

८) नेपथ्यकाराचे नाव - पत्ता व भ्रमणध्वनी क्रमांक (हा रकाना पूर्ण भरावा )

___

___

९) मंडळाने गत वर्षभरात केलेली विशेष कार्ये (थोडक्यात लिहिणे) :-

१०) आपल्या मंडळाने यंदा साकारलेल्या देखाव्यातून कोणता विषय मांडला आहे ?

११) यंदाच्या उत्सवात आपण समाज प्रबोधनात्मक जनजागृती उपक्रम/देखावा केला असल्यास संक्षिप्त तपशील द्यावा.

१२) यंदाच्या उत्सवात आपण पर्यावरण रक्षण जनजागृती देखाव्याचा समावेश केला असल्यास संक्षिप्त तपशील द्यावा.

१३) यंदाच्या उत्सवात आपण बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नागरी सेवा-सुविधांविषयक जनजागृती/देखावा केला असल्यास संक्षिप्त तपशील द्यावा.

१४) यंदाच्या वर्षी आपल्या मंडळामार्फत शाडू मातीच्या मूर्तीची स्थापना करण्यात आली आहे का ?

**या प्रवेश अर्जात दिलेली माहिती खरी असून स्पर्धेसाठी असलेले बृहन्मुंबई महानगरपालिकेचे नियम, अटी आणि परीक्षक मंडळाचे निर्णय इत्यादी बाबी आम्हास बंधनकारक असतील.**

१) श्रीगणेशोत्सव मंडळाच्या पदाधिकाऱ्याची स्वाक्षरी

पूर्ण नाव :

हुद्दा :

दिनांक :

२) श्रीगणेशोत्सव मंडळाच्या पदाधिकाऱ्याची स्वाक्षरी

पूर्ण नाव :

हुद्दा :

दिनांक :

मंडळाचा शिक्का

## खालील कागदपत्रांच्या छायांकित प्रती अर्जासोबत जोडाव्यात :-

- धर्मादाय आयुक्तांचे न्यास नोंदणी प्रमाणपत्र/ संबंधित प्रमाणपत्र.
- उत्सवाचे ठिकाण वापरण्यासाठी महानगरपालिकेकडून मिळालेला परवाना.
- वीज वापरासाठी वीज वितरण कंपनीकडून मिळालेला परवाना व त्यासाठी भरलेल्या रक्कमांची पावती.
- उत्सव साजरा करण्यासाठी स्थानिक पोलीस परवानगीची प्रत.

**( आवश्यक त्या कागदपत्रांच्या मूळ प्रती आणि मंडळाचे मागील पाच वर्षांचे अहवाल परीक्षणाच्या दिवशी दाखविण्यास तयार ठेवावेत.)**

# सण आणि समारंभासाठी रस्त्यांवर तात्पुरते बांधकाम उभारण्यास परवानगी देण्याबाबतच्या धोरणातील महत्त्वाच्या ठळक तरतुदी

**१) प्रस्तावना :-**

मुंबई हे १.२५ कोटींहून अधिक लोकसंख्या असलेले महानगर आहे आणि त्याच्या भौगोलिक परिस्थितीमुळे क्षितिजसापेक्ष विस्तारासाठी जागा उपलब्ध नाही. परिणामी सर्व विभागात लोकसंख्येची घनता अधिक आहे. सार्वजनिकरित्या धार्मिक सण-समारंभ साजरे करण्याकरिता खुल्या जागांची टंचाई आहे. श्रीगणेशोत्सव, नवरात्र, ईद इत्यादींसारखे सण समुदाय / संस्था यांच्याकडून मोठ्या प्रमाणावर साजरे केले जाण्याची ऐतिहासिक परंपरा आहे. या सणांची ऐतिहासिक पार्श्वभूमी विचारात घेऊन 'मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८' मधील कलम ३१७ च्या तरतुदींच्या अंतर्गत विशिष्ट अटी व शर्तींच्या सापेक्ष तसेच पोलीस आयुक्तांच्या सहमतीने रस्ते/ पदपथ यांवर मंडप, तात्पुरते कक्ष इत्यादी उभारण्यास वैधानिक अनुमती देण्यात येते. या कलम ३१७ नुसार, पोलीस आयुक्तांच्या सहमतीने, बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त हे कोणत्याही शर्तीवर समारंभाच्या व उत्सवाच्या प्रसंगी मंडळ व कोणतीही अशी संरचना तात्पुरती उभारण्यासाठी लेखी परवानगी देवू शकतात.

यानुसार गेली काही दशके प्रचलित धोरणानुसार रस्ते / पदपथ यांच्या काही भागावर सण उत्सवांच्या कालावधीत तात्पुरती बांधकामे उभारण्यास विभागीय सहाय्यक आयुक्त यांच्या स्तरावर परवानगी देण्यात येते. महानगरपालिकेने 'पादचारी प्रथम' (पादचाऱ्यांना प्राधान्य) हे धोरणही निश्चित केलेले आहे. जेणेकरुन पादचाऱ्यांना वाहनांबरोबर वाहनांच्या गर्दीतून चालणे भाग न पडता त्यांना पदपथावरुन मुक्तपणे चालता यावे.

माननीय उच्च न्यायालयाने सन २०१४ च्या क्रमांक १२४ च्या दिवाणी दाव्यांमध्ये, तसेच सन २०१३ च्या क्रमांक २२६ आणि सन २०१० च्या क्रमांक १७३ च्या जनहित याचिकांबाबत अनुक्रमे दिनांक १३/०३/२०१५, २४/०६/२०१५ व १७/०७/२०१५ रोजी दिलेल्या आदेशांमध्ये नमूद केले आहे की, 'मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मधील कलम ३१७ अन्वये महानगरपालिका आयुक्तांना, विशिष्ट अटींच्या सापेक्ष रस्त्यावरील तात्पुरत्या बांधकामांना आवश्यक ती परवानगी देण्याचा अधिकार प्राप्त झालेला आहे. अशी तात्पुरती बांधकामे रस्त्यांवरील वाहतूक, पदपथांवरील पादचाऱ्यांचा वावर याला अडथळा ठरता कामा नये आणि महानगरपालिकेला निर्देशित केलेल्या सण / उत्सवांच्या काळात रस्त्यावर उभारण्याच्या तात्पुरत्या बांधकामांबाबत धोरण निश्चित करण्यात यावे'.

माननीय उच्च न्यायालयाने आपल्या दिनांक १७/०७/२०१५ च्या आदेशान्वये असे निर्देश दिलेले आहेत की, 'रेल्वे स्थानके, सार्वजनिक बस स्थानके, मुख्य/ प्रमुख ऑटोरिक्षा थांबे व टॅक्सी थांबे; तसेच मोठी रुग्णालये व शैक्षणिक संस्था यांच्या परिसरामध्ये तात्पुरते कक्ष, मंडप किंवा तत्सम बांधकामे उभारण्याची परवानगी देताना महानगरपालिका आयुक्तांनी संबंधित घटक विचारात घ्यावयास हवेत. सर्व संबंधित घटक विचारात घेतल्यानंतर महानगरपालिका आयुक्तांना खरोखर असे वाटत असेल की, अशा परिसरातील तात्पुरते कक्ष वा तत्सम बांधकामांच्या उभारणीला दिलेल्या परवानगीमुळे वाहतूक वा पादचाऱ्यांचा मुक्त वावर यांना कोणत्याही स्वरुपाचा अडथळा निर्माण होत नाही. तर अशा परिस्थितीत या न्यायालयाचे आदेश महानगरपालिका आयुक्तांचे परवानगी देण्याचे अधिकार काढून घेत नाही; यास्तव आदेशांच्या परिच्छेद ८ च्या अंतिम भागात, प्रकरणांची निश्चिती केवळ उदाहरणे दिलेली आहेत. यांवर विशेष भर दिलेला आहे.'

माननीय उच्च न्यायालयाने आपल्या दिनांक १३/०५/२०१५ च्या आदेशान्वये (परिच्छेद ८) हे स्पष्ट केले आहे की, 'रस्त्यांवर मंडप उभारण्यास देण्यात येणाऱ्या परवानगीचे अधिकार पोलीस आयुक्तांच्या सहमतीशिवाय वापरता येणार नाही. सदर सहमतीशिवाय केलेल्या अधिकारांचा वापर कायद्याच्या दृष्टीने चूक ठरेल.' यास्तव नागरिकांच्या सुविहित वाहतूक आणि पदपथावरील मुक्त वावराचा अधिकार विचारात घेऊन प्रस्तावित धोरण निश्चित केले आहे.

**२) धोरण :-**

महानगरपालिकेच्या रस्त्यांवर / पदपथांवर तात्पुरते बांधकाम करुन कोणताही उत्सव साजरा करावयाचा असल्यास वाहतूक पोलीस विभाग व संबंधित पोलीस ठाण्याद्वारे पोलीस आयुक्तांची पूर्व सहमती घेणे अनिवार्य करण्यात आले आहे. 'मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८' मधील कलम ३१७ च्या तरतुदीनुसार, रस्ते व पदपथांवर तात्पुरती बांधकामे उभारण्यास देण्यात येणाऱ्या परवानगीकरिता पुढील प्रक्रिया विहित करण्यात आली आहे. सणाच्या / उत्सवाच्या ३० दिवस आधी संबंधित विभागाच्या सहाय्यक आयुक्तांना अर्ज सादर करावयास हवा. विभागाचे सहाय्यक आयुक्त नवीन धोरणांच्या तरतुदींच्या आधारे अर्जांची छाननी करतील. सहाय्यक आयुक्तांचा निर्णय हा अंतिम असेल.

२.१) संबंधित प्रशासकीय विभागाचे (वॉर्ड) सहाय्यक आयुक्त महानगरपालिकेच्या रस्त्यांवर तात्पुरती बांधकामे उभारण्यास, 'मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८' मधील कलम ३१७ च्या तरतुदीन्वये परवानगी देतील.

२.२) माननीय उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशांच्या अनुषंगाने परवानगी देण्याआधी प्रस्तावित तात्पुरत्या बांधकामाकरिता/मंडपाकरिता त्या ठिकाणाचा नकाशा, बांधकामाची लांबी, रुंदी व उंची या सहीतचा आराखडा यासह पोलीस आयुक्त किंवा स्थानिक पोलीस ठाण्याचे प्राधिकृत अधिकारी तसेच वाहतूक पोलीस विभाग यांच्याकडून सहमती / ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक आहे.

२.३) सार्वजनिक श्रीगणेशोत्सव मंडळांच्या मंडपांची उंची निर्धारित नियमांप्रमाणे असावी. तसेच, मंडळांना बांधकाम स्थिरतेचे (Structure Stability) प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

२.४) अर्जदारांनी अग्निशमन दल विभागाच्या संदर्भातील सर्व बाबींची पूर्तता करावी.

२.५) रस्त्यांना खड्डे पाडण्यात येऊ नयेत. मंडपाच्या सर्वेक्षणाच्या वेळी खड्डे पडलेले निदर्शनास आल्यास प्रति खड्डा रुपये २०००/- दंड आकारण्यात येईल व वसूल करण्यात येईल. तद्नंतर महानगरपालिकेच्या प्रचलित धोरणानुसार मंडळ / व्यक्तींच्या विरुद्ध आवश्यक ती कारवाई करण्यात येईल.

२.६) अर्जदारांनी विजेची व पाण्याची स्वतंत्र व्यवस्था करावी. आवश्यकतेनुसार स्वतंत्र जोडणी घ्यावी.

२.७) प्रतिबंधित असलेल्या वस्तूंच्या जाहिरातींना मनाई आहे, अशा जाहिरातींना परवानगी दिली जाणार नाही. मंडपातील जाहिरातींकरिता अनुज्ञापन खात्याकडून विहित शुल्क आकारण्यात येईल. तसेच, केवळ १०० मीटर परिसरातील जाहिरातींना परवानगी दिली जाईल.

२.८) सक्षम प्राधिकाऱ्यांनी विहित केलेली ध्वनी / आवाजाची मर्यादा - पातळी यासंबंधीच्या निकषांचे पालन अर्जदारांनी केले पाहिजे.

२.९) ज्या ठिकाणाला परवानगी देण्यात आलेली आहे, त्या ठिकाणाचा वापर अन्य कोणत्याही उद्देशाकरिता करता येणार नाही.

२.१०) ज्या कालावधीकरिता तात्पुरत्या बांधकामाची परवानगी देण्यात आलेली आहे, तो कालावधी समाप्त झाल्यानंतर सदर बांधकाम अर्जदाराला स्वतःच्या जबाबदारीवर स्वखर्चाने काढून टाकावे लागेल. परवानगीत नमूद केलेल्या कालावधीच्या समाप्तीनंतर मुदतवाढ मिळणार नाही.

२.११) सदर ठिकाण महानगरपालिकेला हस्तांतरित करताना स्वच्छ व नुकसानरहित असावे.

२.१२) परवानगी देण्यात आलेल्या तात्पुरत्या बांधकामाच्या अंतर्गत भागात कोणत्याही स्वरुपाच्या 'स्टॉल्स'ना परवानगी मिळणार नाही.

२.१३) उत्सव / समारंभ साजरा करण्याकरिता आवश्यक असलेल्या सर्व परवानग्या आणण्याची जबाबदारी संबंधित मंडळांची असेल.

२.१४) पर्यावरण विभाग, पोलीस खाते, मा. न्यायालये, महानगरपालिका आणि इतर सक्षम प्राधिकारी यांनी वेळोवेळी जारी केलेल्या आदेशांची पूर्तता करणे अर्जदारांना / मंडळांना बंधनकारक आहे.

२.१५) परवानगी प्रत मंडपाच्या प्रवेशद्वारावर, दर्शनी भागात, जनतेला पाहण्यासाठी लावण्यात यावी.

२.१६) उपरोक्त अटी व शर्तींपैकी एकाचेही उल्लंघन झाल्यास अनामत रक्कम पूर्णपणे जप्त करण्यात येईल व बांधकाम उभारण्याकरिता देण्यात आलेली परवानगी रद्द करण्यात येईल.

२.१७) दिलेली परवानगी कोणतेही कारण न देता, कोणत्याही वेळी रद्द करण्याचा अधिकार महानगरपालिका स्वतःकडे राखून ठेवत आहे.

**३) वाहने / पादचारीविषयक घ्यावयाची काळजी :-**

३.१) सर्वसाधारणपणे रेल्वे स्थानक, सार्वजनिक बस स्थानके, ऑटोरिक्षा थांबे, टॅक्सी थांबे, मोठी रुग्णालये आणि शैक्षणिक संस्था यांच्या आसपासच्या रस्त्यांवर वाहतुकीची कोंडी झालेली आढळते. या रस्त्यांवर वाहनांची व पादचाऱ्यांची वर्दळ फार मोठ्या प्रमाणावर असते. ही बाब लक्षात घेता रुग्णालये, शाळा, रेल्वे स्थानके, बस स्थानके इत्यादींच्या नजीक उत्सव साजरा करण्याकरिता मंडप उभारण्याची परवानगी देताना वाहने आणि पादचारी यांच्या सुरळीत वाहतुकीकरिता पुरेशी जागा राखून ठेवण्यात यावी.

३.२) रेल्वे स्थानके, बस स्थानके इत्यादींचे प्रवेशद्वार व निर्गमद्वार यांना थेट अडथळा निर्माण होईल, अशा ठिकाणी मंडप उभारणीची जागा असू नये. तसेच, पादचारी पुलांच्या जिन्यांच्या उतरण्याच्या जागांच्या अगदी समोरदेखील मंडप असू नयेत. रेल्वे स्थानके व बस स्थानके यामधून प्रवाशांचे निर्गमन व मुक्त वावर यांची खातरजमा करण्यात यावी. रुग्णवाहिकांना रुग्णालयातून व्यवस्थित आत व बाहेर जाता यावे यासाठी जागा ठेवणे आवश्यक आहे.

३.२) सण / उत्सव काळांत रस्ते / पदपथांवर तात्पुरत्या बांधकामांना परवानगी देताना, माननीय उच्च न्यायालय यांनी जनहित याचिका क्रमांक १७३/२०१० मध्ये दिलेल्या दिनांक १३/०३/२०१५, दिनांक २४/०६/२०१५, तसेच दिनांक ८, १०, ११, १२ व दिनांक १६/०८/२०१६ आणि परिपत्रक क्रमांक एम. डी. एफ. / ४१८ जन. दिनांक १२/०५/२०१७ व त्यानंतर वेळोवेळी दिलेल्या आदेशांचे सर्व विभागांचे सहाय्यक आयुक्त यांनी काटेकोरपणे पालन करावे.

**४) वाहतूक व्यवस्थेची माहिती प्रदर्शित करणे :-**

४.१) जनतेच्या माहितीकरिता पादचारी आणि वाहनांच्या मार्गांचे तपशील दर्शविणारा नकाशा मंडपावर सुयोग्यरित्या प्रदर्शित करण्यात यावा.

४.२) प्रत्येक मंडळाकडे गर्दीचे व्यवस्थापन करण्याची योजना, आराखडा तयार असावा आणि हा आराखडा मंडपाच्या प्रवेशद्वारावर प्रदर्शित करायला हवा.

**५) विविध नागरी सेवांमधील सक्षम प्राधिकारी तसेच तक्रार कक्षांचे उदा. ध्वनी प्रदूषण, आरोग्यविषयक तक्रारी, सुरक्षा व्यवस्था, विविध स्वरुपाचे उपद्रव इत्यादींचे दूरध्वनी क्रमांक/ भ्रमणध्वनी क्रमांक प्रत्येक मंडळाने प्रदर्शित करावयास हवेत.**

**६) तक्रार निवारण व्यवस्था :-**

मंडप, ध्वनी प्रदूषण इत्यादी तक्रारी नागरिकांना करता याव्यात, यासाठी प्रत्येक विभागाच्या सहाय्यक आयुक्तांद्वारे तक्रार निवारण अधिकारी नेमले जातील. या तक्रार निवारण अधिकाऱ्यांद्वारे तक्रारींच्या तत्काळ निवारणासाठी कार्यवाही केली जाईल. या अनुषंगाने प्रत्येक विभागस्तरीय सहाय्यक आयुक्तांच्या स्तरावर तक्रार नोंदवही असेल. दूरध्वनी किंवा लेखी स्वरुपात प्राप्त होणाऱ्या तक्रारींची नोंदणी ही पुढील नमुन्यात करण्यात यावी :

**तक्रार नोंदवही नमुना 'अ' (ध्वनी प्रदूषणाबाबत)**

| अनु. क्र. | तक्रारीचा दिनांक व वेळ | तक्रारदाराचे नाव, पत्ता आणि दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक | तक्रारीचा तपशील | तक्रार पाठविली त्या पोलीस ठाण्याचे नाव, अधिकाऱ्याचे पदनाम, जावक क्रमांक व दिनांक | तक्रारीवर करण्यात आलेल्या कारवाईचा तपशील | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

**तक्रार नोंदवही नमुना 'ब' (अनधिकृत मंडपाबाबत)**

| अनु. क्र. | तक्रारीचा दिनांक व वेळ | तक्रारदाराचे नाव, पत्ता आणि दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक | तक्रारीचा तपशील | तक्रार अग्रेषित करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम, जावक क्रमांक व दिनांक | संबंधित अधिकाऱ्यामार्फत तक्रारीवर करण्यात आलेल्या कारवाईचा तपशील | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

सदर नोंदवही सहाय्यक आयुक्त नियमितपणे तपासतील. सर्व तक्रारींचे निवारण झाल्याबाबतची खातरजमा सहाय्यक आयुक्त करतील. संबंधित विभागाचे सहाय्यक आयुक्त व तक्रार निवारण अधिकारी यांचे दूरध्वनी क्रमांक आणि ई-मेल आयडी सर्व अर्जदारांनी सर्वसामान्य जनतेच्या माहितीकरिता मंडपावर ठळकपणे प्रदर्शित करावेत.

**७) रेल्वे स्थानके, बस स्थानके, रिक्षा / टॅक्सी थांबे, रुग्णालये, शैक्षणिक संस्था इत्यादी परिसरात जेथे विशिष्ट वेळेत मोठ्या प्रमाणावर वर्दळ व पादचाऱ्यांचा वावर असतो; अशा ठिकाणी तात्पुरत्या बांधकामांना परवानगी देताना, पादचाऱ्यांना पुरेशी जागा उपलब्ध आहे, याची खात्री करताना विभागीय सहाय्यक आयुक्तांनी अधिक काळजी घ्यावी.**

महानगरपालिका आयुक्त
बृहन्मुंबई महानगरपालिका

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## परिपत्रक

**क्र. अअ/०२/जाहिरात/२०२६-२७, दिनांक २०-०८-२०२६**

**अनुज्ञापन अधीक्षक यांचे कार्यालय**
**६ वा मजला, मलनि:सारण प्रचालन**
**प्रशासकीय कार्यालये इमारत, दादर उदंचन केंद्र २४९,**
**सेनापती बापट मार्ग, दादर, मुंबई- ४०० ०२८**

**विषय : सार्वजनिक गणेशोत्सव व नवरात्रौत्सव २०२६ दरम्यान जाहिरात प्रदर्शित करण्याबाबत निकष**

गणेशोत्सव व नवरात्रौत्सव मंडळांना व्यावसायिक जाहिराती प्रदर्शित करण्याबाबत दि. २६-११-२००७ रोजीच्या महानगरपालिकेच्या सभेतील ठराव क्र. ९६६ अन्वये घेतलेल्या निर्णयानुसार गणेशोत्सव व नवरात्रौत्सव मंडळांना मंडपाच्या प्रवेशद्वारापासून १०० मीटर अंतरापर्यंत व्यावसायिक जाहिरात प्रदर्शित करण्यास सरसकट रु. १०१/- इतकी रक्कम तसेच १०० मीटर अंतराबाहेरील प्रवेशद्वार व्यावसायिक जाहिरात प्रदर्शित करण्याकरिता फक्त एका प्रवेशद्वारावर रु. १०००/- आकारुन परवानगी द्यावी. मात्र मंडळाच्या प्रवेशद्वारापासून १०० मीटर अंतराबाहेर प्रवेशद्वाराव्यतिरिक्त रस्त्यांवर / पदपथांवर कोणतीही जाहिरात अनुज्ञेय नाही.

तसेच मा. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) यांचे आदेश क्र. अति. आयुक्त /शहर/७४०/ III/ दि. २१-०७-२००६ अन्वये मंडपात प्रदर्शित करण्यात येणाऱ्या व्यावसायिक जाहिरातींसाठी सरसकट रु.१२५/- आकारुन परिपत्रक क्र. अति. आ./शहर/१४४७/ दि.२१-०२-२०११ च्या अधीन राहून परवानगी द्यावी.

१) गणेशोत्सव व नवरात्रौत्सव मंडळांना गुटखा व तंबाखूसंबंधीच्या उत्पादनांची आणि मद्याच्या (लिकरच्या) कोणत्याही प्रतिबंधित उत्पादनांच्या त्याच ब्रँडखाली इतर जाहिराती किंवा कोणत्याही सिनेमा, दूरचित्रवाणी मालिकांसंबंधी जाहिरातींमध्ये अश्लील जाहिराती प्रदर्शित करण्यास प्रतिबंध असेल.

२) जाहिराती प्रदर्शित करताना पदपथावरील पादचाऱ्यांना तसेच रस्त्यावरील वाहतुकीला कुठल्याही प्रकारे अडथळा होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

३) मंडळाच्या पारंपरिक प्रवेशद्वाराच्या वरच्या आडव्या बाजूवर मंडळास 'भक्तांचे हार्दिक स्वागत' संदेश लावता येईल. प्रवेशद्वाराच्या उजव्या व डाव्या उभ्या बाजूवर देणगीदारांची व्यावसायिक जाहिरात प्रदर्शित करता येईल.

४) महानगरपालिका प्रशासनाच्या निर्देशानुसार, सामाजिक व नागरी संदेश लावणे गणेशोत्सव व नवरात्रौत्सव मंडळांवर बंधनकारक राहील.

